# सनी लिओनी आणि डॅनियल वेबर यांच्या मुलांना PETA इंडियाचा कम्पॅशनेट किड अवॉर्ड मिळाला

मुंबई – बालदिनाच्या पार्श्वभूमीवर (14 नोव्हेंबर) अभिनेत्री सनी लिओनी आणि संगीतकार डॅनियल वेबर यांची मुले – 8 वर्षांची निशा कौर वेबर आणि 5 वर्षांची जुळी मुले ॲशर सिंग वेबर आणि नोआह सिंग वेबर यांना प्राण्यांप्रती त्यांच्या कनवाळूपणाच्या कृत्यांची दखल घेतल्यामुळे पीपल फॉर द एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स (PETA) इंडियाचा कम्पॅशनेट किड अवॉर्ड मिळाला आहे.

**Photos are available here.**

प्रत्येक मुलाने हत्तींना मदत करण्याच्या याचिकेवर स्वाक्षरी केली असून ते देशभरातील 1,00,000 विद्यार्थ्यांमध्ये सहभागी झाले आहेत. ही मुले केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्र्यांना आवाहन करत आहेत की, हत्तींना प्रदर्शन, प्रशिक्षण किंवा पर्यटन सहली, सर्कस किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या मनोरंजनासाठी वापरल्या जाण्यापासून संरक्षित प्रजातींच्या यादीत समाविष्ट करावे. आणि दिवाळीच्या आधी, सनी आणि डॅनियल यांच्या मुलांनी त्यांच्या मित्रांना फूलचे लागवड करता येतील असे "फटाके" (जे वास्तविक बियाणे आहेत) वाटलेत. त्यामुळे सर्वांना मजा येईल अशा पद्धतीने सुट्टी साजरी करता येईल आणि त्या सर्वांमध्ये त्रास होत असलेल्या व अनेकदा मोठ्या स्फोटांनी घाबरून हरवून जाणाऱ्या जनावरांचा समावेश आहे. ही मुले त्यांच्या पालकांसोबत त्यांच्या परिसरातील सामुदायिक जनावरांना अन्न आणि पाणी पुरविण्यात सहभाग घेत आहेत.

"प्राण्यांशी कनवाळू पद्धतीने वागण्यास मी माझ्या मुलांना शिकवत असते. त्यामुळे त्यांना मोठे होऊन सर्वांप्रती कनवाळू राहता येईल", असे सनीचे म्हणणे आहे. "ही आजची कनवाळू मुले उद्याचा अधिक शांततापूर्ण समाज आहेत."

निशा सांगते, "प्राणी माझे मित्र आहेत आणि माझे मित्र दुखावले गेले तर ते मला आवडत नाही." "आपल्याप्रमाणेच प्राण्यांना भूक लागते, त्यांना दु:ख आणि आनंद होतो. त्यामुळे मी आवडीने माझा भाऊ ॲशर आणि नोआह यांच्यासोबत त्यांची काळजी घेते."

PETA इंडियाच्या शिक्षण आणि युथ आउटरीच डायरेक्टर पूजा महाजन सांगतात, "निशा, ॲशर आणि नोआह त्यांच्या समुदायातील आणि संपूर्ण भारतातील प्राण्यांसाठी खूप मोठा बदल घडवत आहेत. या बालदिनी PETA इंडिया त्यांचा आणि प्राण्यांप्रती कनवाळू असलेल्या सर्व मुलांचा गौरव करत आहे."

प्रदर्शनासाठी वापरले जाणारे हत्ती गंभीर मानसिक त्रास आणि निराशेची चिन्हे दर्शवितात - जसे की डोलणे, डोके हलवणे आणि वीविंग करणे, जे जंगलातील हत्तींमध्ये न पाहिलेले वर्तन आहे. सादरीकरणासाठी उपयोग केल्या जाणाऱ्या जनावरांना नेहमी मारहाणीद्वारे नियंत्रित केले जाते, बरेच तास साखळदंडाने बांधून ठेवले जाते.

PEOPLE FOR THE ETHICAL TREATMENT OF ANIMALS

PETA India
PO Box 28260
Juhu, Mumbai 400 049
(22) 4072 7382
(22) 2636 7383 (fax)

Info@petaindia.org
PETAIndia.com

NEWS RELEASE

Affiliates:
- PETA Asia
- PETA Australia
- PETA Foundation (UK)
- PETA France
- PETA Germany
- PETA Netherlands
- PETA US

Registered Office:
F-110, 1st Floor, Jagdamba Tower
Plot No 13, Community Centre
Preet Vihar, New Delhi
110 092

PETA इंडियाने नागरिकांना आवाहन केले आहे की, दिवाळीत आपल्या साथीदार जनावरांना घरातच ठेवावे, खिडक्या आणि पडदे बंद करावेत व रेडिओ किंवा टीव्ही चालू करून आवाजाचे प्रमाणे कमी करावे. असे करून त्यांना सुरक्षित ठेवावे.

PETA इंडिया आपला **कम्पॅशनेट सिटीझन** कार्यक्रम शिक्षकांना मोफत प्रदान करत आहे जेणेकरून अधिक कनवाळू मुले तयार करता येतील. हे 8 ते 12 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेले आहे आणि प्राण्यांप्रती कनवाळू राहण्याचे महत्त्व त्यांना शिकवते.

PETA इंडिया - ज्याचे ब्रीदवाक्य आहे काही अंशी असे आहे की, "प्राणी आपले नाहीत की आपण त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे अत्याचार करावा" - प्रजातीवादाला विरोध करते, जो एक मानव-वर्चस्ववादी जागतिक दृष्टिकोन आहे. अधिक माहितीसाठी, कृपया **PETAIndia.com** ला भेट द्या किंवा एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक किंवा इंस्टाग्राम वर असलेल्या आमच्या ग्रुपला फॉलो करा.

**संपर्क:**
हिरज लालजानी 9619167382. HirajL@petaindia.org
संस्कृती बन्सोरे 9167937382; SanskritiB@petaindia.org

#

PEOPLE FOR THE ETHICAL TREATMENT OF ANIMALS

PETA India
PO Box 28260
Juhu, Mumbai 400 049
(22) 4072 7382
(22) 2636 7383 (fax)

Info@petaindia.org
PETAIndia.com

NEWS RELEASE

Affiliates:
- PETA Asia
- PETA Australia
- PETA Foundation (UK)
- PETA France
- PETA Germany
- PETA Netherlands
- PETA US

Registered Office:
F-110, 1st Floor, Jagdamba Tower
Plot No 13, Community Centre
Preet Vihar, New Delhi
110 092